नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १३३ Issue - 133 | वार - गुरुवार दि. ८ ऑक्टोबर २०२६ Blow- Thursday Date 8 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान केंद्र सरकारची टीम घेणार दुष्काळी भागाचा आढावा

### महाराष्ट्रात दुष्काळ; मुख्यमंत्री फडणवीस यांनी सविस्तर माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना दिली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे ११ सदस्यीय आंतरमंत्रालयीन पथक ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान राज्याच्या दौऱ्यावर येत आहे.

दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथक उद्यापासून म्हणजेच ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहे. केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने याबाबत अधिकृत आदेश जारी केला आहे. नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. तसेच राज्यातील दुष्काळ स्थितीबाबत त्यांना माहिती दिली होती. या भेटीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, 'आपण जो काही प्रस्ताव पाठवला आहे त्याची माहिती देण्यासाठी गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे गेलो होतो. त्या प्रस्तावा-ची प्रतदेखील अमित शाह यांना दिली आहे. मी त्यांना सांगितलं की, महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या देखील तयार होणार आहे.



चाऱ्याची समस्यादेखील तयार होणार आहे. जवळपास ३२ जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळ बघायला मिळत आहे आणि आपण विचार केला तर ८० टक्के तालुके हे दुष्काळाने पूर्णपणे प्रभावित पाहायला मिळतात. केंद्र सरकारने म हाराष्ट्राला विशेष मदत करावी. आम्ही जो प्रस्ताव पाठवतोय त्या संदर्भात तात्काळ केंद्राची टीम यावी, अशाप्रकारची विनंती त्यांना केलेली आहे.' या भेटीनंतर केंद्राचं पथक ८ ऑक्टोबरपासूनच राज्याच्या दुष्काळी भागाची पाहणी करणार आहे.

या दौऱ्यामुळे राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील प्रत्यक्ष परिस्थिती, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई तसेच संबंधित बाबींचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन होणार आहे. केंद्रीय पथकातील अधिकारी प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेऊन परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. तीन पथकांद्वारे विविध भागांची पाहणी केली जाणार आहे. दुष्काळ पाहणीसाठी ११ सदस्यांचे आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथक नियुक्त करण्यात आले आहे. यात कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि इतर संबंधित विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. पथकाचे नेतृत्व मुक्तानंद अग्रवाल, संयुक्त सचिव (पीक विमा), कृषी व शेतकरी कल्याण विभाग करीत आहेत.

पाहणीसाठी पथकाचे तीन गट करण्यात आले आहेत. पथक एक पश्चिम महाराष्ट्रातील अहिल्यानगर, सोलापूर पुणे जिल्ह्यात; पथक दोन मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड जिल्ह्यांना भेट देणार आहे. पथक तीन विदर्भातील नागपूर, यवतमाळ जिल्हा आणि लगतच्या टंचाईग्रस्त भागांची पाहणी करणार आहे. केंद्र आणि राज्य यंत्रणांमध्ये समन्वय साधत होणाऱ्या या प्रत्यक्ष पाहणीमुळे दुष्काळी परिस्थितीचे क्षेत्रीय स्तरावरील वास्तव अधिक स्पष्टपणे समोर येण्यास मदत होणार आहे. जिल्हानिहाय अंतिम कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर पथकाच्या भेटींचे नियोजन करण्यात येणार आहे.

## भारताला नव्या उंचीवर नेण्यासाठी जनतेचा उत्साह आणि 'सबका प्रयास' अत्यंत गरजेचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत २०४७'साठी दिला नवा मंत्र**

नवी दिल्ली : आपल्या आयुष्यात कधीही निवडणूक लढवण्याचा विचार केला नव्हता, कारण लहानपणाप-ासून मिळालेले संस्कार आणि शिक्षण यांनी आपल्याला 'महत्त्वाकांक्षेसाठी नाही, तर ध्येयासाठी जगणारी व्यक्ती' बनवले आहे, असे भावूक उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी (झीळाश चळपळींशी छरी-शपवीर चेवळ) यांनी काढले. सरकारप्रमुख म्हणून २५ वर्षांचा प्रदीर्घ कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित 'विकसित भारत संकल्प सभे'त ते बोलत होते. आपल्यासाठी कार्य करणे ही केवळ जबाबदारी नसून देशसेवा आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आजचा दिवस हा केवळ जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा नाही, तर आपल्या संकल्पांमध्ये नवी ऊर्जा भरण्याचा दिवस आहे. भारताला नव्या उंचीवर नेण्यासाठी जन-तेचा उत्साह आणि 'सबका प्रयास' अत्यंत गरजेचे आहेत. यावेळी त्यांनी उपस्थितांकडून आम्ही हे करून दाखवू! या संकल्पाचा पुनरुच्चार करून घेतला. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवणे, जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणे, आत्मनिर्भर भारत घडवणे, जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनणे, ऑलिंपिकचे आयोजन करणे आणि अंतराळ क्षेत्रात नवी झेप घेणे, हे सर्व संकल्प देश नक्कीच पूर्ण करेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**माझा राजकीय प्रवास कार्यकर्त्याचा होता**

आपल्या २५ वर्षांच्या प्रशासकीय प्रवासावर बोलताना पंतप्रधान म्हणाले की, अनेक लोक या २५ वर्षांच्या अखंड सेवेला माझे मोठे यश मानतात. पण मी याकडे वैयक्तिक मोठेपण म्हणून पाहत नाही. २५ वर्षांपूर्वी, वयाच्या पन्नासाव्या वर्षी मी आदिवासी भागात आणि पर्वतीय प्रदेशात समाजकार्य करत होतो आणि भारतीय जनता पक्षात एक संघटक म्हणून कार्यरत होतो. निवडणूक लढवण्याचा माझा कोणताही विचार नव्हता आणि तसा स्वभावही नव्हता.

राजकारणात येण्यामागे कोणताही वैयक्तिक स्वार्थ नव्हता असे सांगत त्यांनी भगवद्गीतेतील 'कर्मण्येवाधिकारस्ते' या श्लोकाचा संदर्भ दिला. मला मिळालेली प्रत्येक जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडली आहे. देशासाठी निष्काम कर्म करणे हेच माझ्या आयुष्याचे अंतिम ध्येय आहे. देशवासीयांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि मिळालेल्या संधींमुळेच मी आज अखंड सेवा करू शकत आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

**गुजरातच्या अनुभवातून शिकलो प्रशासनाचे धडे**

गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून झालेला प्रवास आठवत पंतप्रधान मोदी म्हणाले की, जेव्हा मी गुजरातची सूत्रे हातात घेतली, तेव्हा माझ्याकडे सरकार चालवण्याचा किंवा प्रशासनाचा कोणताही अनुभव नव्हता. पण माझ्याकडे जनतेवर अस-लेला विश्वास आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून मिळालेला अनुभव हीच माझी खरी ताकद होती. 'गुजरातचा विकास हाच देशाचा विकास' या मंत्रावर चालत आम्ही अनेक आव्हानांवर मात केली. हे २५ वर्षे माझे वैयक्तिक यश नसून या काळात देश किती पुढे गेला, यावरून याचे मूल्यम ापन झाले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

## गृहकर्जधारकांना मोठा झटका, रिझर्व्ह बँकेने रेपो रेट वाढवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेली अस्थिरता, वाढती महागाई, भांडवली बाजारातील मोठी पडझड या सगळ्या पार्श्वभूम ीवर अखेर भारतीय रिझर्व्ह बँकेने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी बुधवारी रेपो रेटम ध्ये वाढ करत असल्याची घोषणा केली. रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंटची वाढ केली आहे. त्यामुळे रेपो रेट ५.२५ टक्क्यांवरुन ५.५० टक्के इतका झाला आहे. याचा परिणाम आता कर्जदारांवर होणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयानंतर बँकाकडून लवकरच गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाचा व्याजदरात मोठी वाढ होऊ शकते. त्यामुळे गृहकर्ज घेतलेल्या सामान्य नागरिकांचा मासिक हप्ता म्हणजे ईएमआय वाढण्याची शक्यता आहे. गेल्या चार वर्षांमध्ये रिझर्व्ह बँकेने पहिल्यांदाच रेपो रेटमध्ये वाढ केली आहे. म हागाई आटोक्यात आणण्यासाठी आरबीआयने रेपो रेटमध्ये वाढ केल्याचे बोल-ले जात आहे. कच्च्या तेलांच्या किंमतीत होत असलेल्या सातत्याने भारतासाठी चिंतेचा विषय आहे. महागाई दरात सातत्याने वाढ होत असल्याचे निरीक्षण आरबीआयने यावेळी नोंदवले.

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या द्वैमासिक बैठकीत रेपो रेट वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. बहुतांश अर्थतज्ज्ञांनी रेपो रेटमध्ये वाढ होण्याचा अंदाज (पान २ वर...)

## डीसीसी बँक निवडणूक : अक्कलकोटमधून सचिन दादा कल्याणशेट्टी होणार बिनविरोध?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : सोला-पूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची तयारी सुरू असतानाच अक्कलकोट तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. संचालकपदासाठी इच्छुकांची संख्या असली, तरी उमेदवारीच्या पात्रतेसमोर थकीत कर्जवसुलीचा मोठा प्रश्न उभा राहिल्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या विरोधात पर्याय उभा करण्याचे आव्हान वाढले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील ८९ विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांपैकी फक्त आठ सोसायट्यांची कर्जवसुली शंभर टक्के झाली आहे. उर्वरित ८१ सोसायट्यांमध्ये थकबाकी असल्याने या संस्थांशी संबंधित इच्छुकांच्या उम ेदवारीवर पात्रतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे निवडणुकीच्या मैदानात उतरण्यापूर्वीच अनेक इच्छुकांना नियम ांच्या कसोटीला सामोरे जावे लागणार आहे.

सध्याच्या आकडेवारीनुसार अक्कलकोटमध्ये सोसायटी मतदारसंघाचे ८९, पणन संस्थांचे ४७ आणि इतर एक असे १३७ पात्र मतदार आ-हेत. त्यामुळे उपलब्ध पात्र संस्थांवरच पुढील निवडणूक गणित मोठ्या प्रम ाणात अवलंबून राहणार आहे.

**३२ ठरावांवरील हरकती निर्णायक**

अक्कलकोटमधील ३२ सोसायट्यांच्या ठरावांवर हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. या हरकतींवर ५ ऑक्टोबरपासून पुण्यातील सहकार विभागाच्या कार्यालयात सुनावणी सुरू झाली आहे. या निर्णयामुळे कोणत्या संस्था निवडणुकीच्या प्रक्रियेत कायम राहतात आणि कोणत्या बाद होतात, हे स्पष्ट होणार आहे.




त्यामुळे या सुनावणीचा निकाल अक्कलकोटमधील ऊउउ निवडणुकीच्या राजकीय समीकरणासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**सहकार क्षेत्रात कल्याणशेट्टींची सक्रियता**

अक्कलकोटच्या सहकार क्षेत्रात दिवंगत सिद्रामप्पा पाटील यांचा दीर्घकाळ प्रभाव होता. मात्र, मागील काही वर्षांत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सहकार क्षेत्रातील हालचालींकडे अधिक लक्ष दिल्याचे दिसून येत आहे. ऊउउ निवडणुकीच्या निमित्ताने या क्षेत्रातील राजकीय समीकरणे नव्याने जुळवली जात आहेत.

विशेष म्हणजे विरोधी गटातील अनेक संस्थांच्या कर्जवसुलीची स्थिती आणि त्यांच्यावरील हरकती यामुळे उमेदवारीचा मार्गच अडचणीचा ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे कल्याणशेट्टी यांच्याविरोधात उमेदवार उभा राहणार की निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न होणार, याकडे आता अक्कलकोटच्या सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. आता ३२ ठरावांवरील सुनावणीचा निकाल आणि अंतिम मतदार यादी स्पष्ट झाल्यानंतरच अक्कलकोटमध्ये ऊउउ निवडणुकीचे खरे चित्र समोर येणार आहे.

**२०० खासदारांसह जंतरमंतर मैदानावर आंदोलनासाठी जात असताना पोलिसांनी अडवलं**

**राहुल गांधींना पोलिसांनी उचलताच काँग्रेस आक्रमक**

## दिल्लीत प्रचंड राडा; राहुल गांधींना पोलिसांनी उचलून गाडीत कोंबलं, प्रियांका गांधींही ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक झा-लेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पुन्हा एकदा दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. राहुल गांधी हे इंडिया आघाडीच्या जवळप-ास २०० खासदारांसह दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर आंदोलनासाठी जात असताना पोलिसांनी त्यांना अडवलं आणि ताब्यात घेतलं आहे. त्याचसोबत आंदोलन करणाऱ्या प्रियंका गांधींनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी देशाची लोकशाही धोक्यात आणली असून त्यांना राजीनामा द्यावाच लागेल, असा इश-ारा राहुल गांधी यांनी दिला आहे.

मंगळवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला. त्यावेळी त्यांना दिल्ली पोलिसांनी अडवलं. राहुल गांधी यांनी तब्बल ८ तास आकाशवाणी भवनवर ठिय्या मांडला. त्यानंतर रात्रीच्या वेळी दिल्ली



पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं होतं.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म ल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीच्या खासदारांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर हे सर्व खासदार तीन बस भरून दिल्लीच्या जंतरमंतर मैदानाकडे निघाले. परंतु या मैदानापासून १०० मीटर अंतरावरच पोलिसांनी या बस अडवल्या.

पोलिसांनी राहुल गांधींना आंदोलन करण्यापासून अटकाव केल्यानंतर राहुल गांधींनी त्याच ठिकाणी ठिय्या मांडला. प्रियंका गांधीही यावेळी रस्त्यावर आडव्या पडल्या. पोलिसांनी आपल्यासह इतर खासदारांना मारहाण केल्याचा आर-ोपही त्यांनी केला.

दरम्यान, पोलिसांनी राहुल गांधींना आंदोलन करू नये यासाठी मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र राहुल गांधी आंदोलनावर ठाम होते. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. आधी राहुल गांधी यांना ताब्यात घेतलं, त्यानंतर प्रियंका गांधी यांच्यासह इतर खासदारांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं.

गेल्या दोन दिवसांपासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी इंडिया आघाडीचे खासदार आक्रमक झाले आहेत. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढत त्यांनी ज्ञानेश कुमार आणि इतर आयुक्तांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनीही राहुल गांधी यांना गेल्या २४ तासांम ध्ये दुसऱ्यांदा ताब्यात घेतल्याचं चित्र आहे.

## संपादकीय....

### उत्साहपूर्ण संभाषण

आपल्या आयुष्यात कधीही निवडणूक लढवण्याचा विचार केला नव्हता, कारण लहानपणापासून मिळालेले संस्कार आणि शिक्षण यांनी आपल्याला 'महत्त्वाकांक्षेसाठी नाही, तर ध्येयासाठी जगणारी व्यक्ती' बनवले आहे, असे भावूक उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच सरकारप्रमुख म्हणून २५ वर्षांचा प्रदीर्घ कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित 'विकसित भारत संकल्प सभे'त काढले. आपल्यासाठी कार्य करणे ही केवळ जबाबदारी नसून देशसेवा आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे. आजचा दिवस हा केवळ जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा नाही, तर आपल्या संकल्पांमध्ये नवी ऊर्जा भरण्याचा दिवस आहे. भारताला नव्या उंचीवर नेण्यासाठी जनतेचा उत्साह आणि 'सबका प्रयास' अत्यंत गरजेचे आहेत. यावेळी त्यांनी उपस्थितांकडून आम्ही हे करून दाखवू! या संकल्पाचा पुनरुच्चार पंतप्रधानांनी करून घेतला. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवणे, जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणे, आत्मनिर्भर भारत घडवणे, जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनणे, ऑलिंपिकचे आयोजन करणे आणि अंतराळ क्षेत्रात नवी झेप घेणे, हे सर्व संकल्प देश नक्कीच पूर्ण करेल. राजकारणात येण्यामागे कोणताही वैयक्तिक स्वार्थ नव्हता असे सांगत त्यांनी भगवद्गीतेतील 'कर्मण्येवाधिकारस्ते' या श्लोकाचा संदर्भ दिला. मला मिळालेली प्रत्येक जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडली आहे. देशासाठी निष्काम कर्म करणे हेच माझ्या आयुष्याचे अंतिम ध्येय आहे. माझ्याकडे जनतेवर असलेला विश्वास आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून मिळालेला अनुभव हीच माझी खरी ताकद होती. हे २५ वर्षे माझे वैयक्तिक यश नसून या काळात देश किती पुढे गेला, यावरून याचे मूल्यमापन झाले पाहिजे.

## गृहकर्जधारकांना मोठा झटका, रिझर्व्ह बँकेने रेपो रेट वाढवला

(पान १ वरून..) वर्तवला होता. फेब्रुवारी २०२५ नंतर रिझर्व्ह बँकेने रेपो रेट स्थिर किंवा त्यामध्ये कपात करण्याचे धोरण ठेवले होते. फेब्रुवारी २०२३ मध्ये आरबीआयने रेपो रेट ०.२५ टक्क्यांनी वाढवून ६.५० टक्के इतका केला होता. २०२३-२४ या आर्थिक वर्षात रेपो रेटचा हा दर कायम होता. त्यानंतर फेब्रुवारी २०२५ पासून रिझर्व्ह बँकेने सातत्याने रेपो रेटमध्ये कपात करत तो ५.२५ टक्क्यांपर्यंत खाली आणला होता. रेपो रेट म्हणजे ज्या दराने बँका रिझर्व बँकेकडून पैसे घेते तो दर. रेपो रेट वाढणं म्हणजे बँकांना रिझर्व बँकेकडून मिळणाऱ्या कर्जदरात वाढ होणं, तर रेपो रेट कमी होणं म्हणजे बँकेला स्वस्तात पैसे मिळणं. म्हणजेच आरबीआयने रेपो रेट वाढवला तर पर्यायाने सर्व बँकांना ग्रहकांना द्यावयाची कर्जाचे दरही वाढवावे लागतात. तर कमी झाल्याने व्याज दर कमी होतो. बँका रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेते, त्यावर रिझर्व्ह बँक जो व्याजदर आकारते, त्याला रेपो रेट म्हणतात. जर रेपो रेट कमी झाला, तर बँकांना रिझर्व्ह बँकेला कमी व्याज द्यावं लागेल. त्यामुळे जर बँकांना फायदा झाला, तर बँका ग्राहकांनाही व्याजदर कपात करुन फायदा मिळवून देते.

# भारतीय हवाई दलः आधुनिक तंत्रज्ञान, अत्याधुनिक लढाऊ विमानं, आणि कुशल पायलट्स

**(८-१४ ऑक्टोबर:भारतीय हवाई दल दिन सप्ताह.)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय हवाई दल दिन दरवर्षी ८ ऑक्टोबरला साजरा केला जातो, जो १९३२ साली भारतीय हवाई दलाच्या स्थापनेची आठवण करून देतो. या दिवसाचा उद्देश हवाई दलाच्या शौर्य, समर्पण, आणि त्यागाला सन्मान देणे आहे. भारतीय हवाई दल देशाच्या हवाई संरक्षणासाठी आणि आंतरराष्ट्रीय शांतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सदर मार्गदर्शक संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी वाचकसेवेत समर्पित करताहेत जी.... संपादक.

भारतीय हवाई दलाने विविध युद्धांमध्ये आणि आपत्ती व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेषतः सन १९६५ आणि १९७१ च्या युद्धांमध्ये, तसेच कारगिल युद्धात हवाई दलाने देशाच्या संरक्षणात निर्णायक भूमिका निभावली. आधुनिक तंत्रज्ञान, अत्याधुनिक लढाऊ विमानं, आणि कुशल पायलट्स यांच्या बळावर भारतीय हवाई दल जगातील प्रमुख हवाई दलांमध्ये गणले जाते. हवाई दल दिनाच्या निमित्ताने विविध ठिकाणी विमानांचे भव्य प्रदर्शन, पथ संचलन आणि शौर्य पदके प्रदान समारंभ आयोजित केले जातात. हा दिवस भारतीय हवाई दलाच्या पराक्रमाला आणि देशाच्या संरक्षणातील त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहण्याचा एक खास दिवस आहे.

भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते.

दलाचे ध्येयवाक्य: नभ:स्पृशं दीप्तम्। हे भारतीय वायुसेनेचे ध्येयवाक्य आहे. हे पवित्र भगवद् गीतेतल्या एका श्लोकातून घेतलेले आहे-

नभ:स्पृशं दीप्तमनेकवर्णं
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा ही त्वां प्रव्यथितान्तरात्मा
धृतिं न विन्दामि शमंच विष्णो।।
पवित्र भगवद्गीता ११.२४)

अर्थ : हे विष्णो, आकाशस्पर्शी ज्योतीसारख्या आणि अनेकवर्णयुक्त, उघड्या मुखाच्या आणि प्रज्वलित विशाल नेत्रांच्या तुला पाहून भयभीत झालेल्या मजमध्ये धैर्य आणि शांती नाहीसे झाले आहेत.

इतिहास : ❁ स्थापना - दि. ८ ऑक्टोबर इ.स. १९३२ मध्ये भारतीय वायुसेनेची स्थापना झाली. सुब्रतो मुखर्जी हे पहिले भारतीय एका स्क्वाड्रनचे वायुदलातले प्रमुख होते. दि. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एर फोर्स झाले. ❁ विमाने : इ.स. १९४७ मध्ये विमानांना पिस्टन वर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा नंतर वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने रशियन लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सद्याच्या काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणकीय प्रणाली वायुसेनेकडे आहे. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. २१ व्या शतकाच्या सुरुवातीस वायुसेनेकडे अनेक देशांतून उत्पादन केलेली विमाने आहेत.

सहभाग व मोहिमा : सन १९५० पासून भारतीय हवाई दलाने शेजारील पाकिस्तानसोबत चार युद्धांमध्ये सहभाग घेतला आहे. भारतीय हवाई दलाने हाती घेतलेल्या इतर प्रमुख मोहिमांमध्ये ऑपरेशन विजय, ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन कॅक्टस, ऑपरेशन पूमलाई




आणि नुकताच ऑपरेशन सिंदूर यांचा समावेश आहे . भारतीय हवाई दलाची मोहीम केवळ शत्रू सैन्याशी संघर्ष करण्यापुरती मर्यादित नाही, तर ते संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्येही सहभागी होते. भारताचे राष्ट्रपती भारतीय हवाई दलाच्या सर्वोच्च कमांडर पदावर आहेत. दि. १ जानेवारी २०२५ पासून भारतीय हवाई दलात १,३५,००० कर्मचारी सेवेत आहेत. हवाई दल प्रमुख- चीफ ऑफ द एअर स्टाफ, जे एअर चीफ मार्शल असतात, हे चार-तारांकित अधिकारी असतात आणि हवाई दलाच्या बहुतांश ऑपरेशनल कमांडची जबाबदारी त्यांच्यावर असते. भारतीय हवाई दल- आइएएफमध्ये कोणत्याही वेळी एकापेक्षा जास्त एअर चीफ मार्शल कार्यरत नसतात. इतिहासात एकदाच भारताच्या राष्ट्रपतींनी अर्जन सिंग यांना 'मार्शल ऑफ द एअर फोर्स' हा दर्जा प्रदान केला आहे. दि.२६ जानेवारी २००२ रोजी सिंग हे भारतीय हवाई दलाचे पहिले आणि आतापर्यंतचे एकमेव पाच-तारांकित दर्जाचे अधिकारी बनले.

हिंडन एअर फोर्स स्टेशन, गाझियाबाद, उत्तर प्रदेश. आयएएफ प्रमुख आणि तीन सशस्त्र दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा उत्सव साजरा केला जातो. या दिवशी, सर्वात निर्णायक आणि विंटेज विमानांनी एक भव्य प्रदर्शन ठेवले जाते जे खुल्या आकाशात प्रदर्शित केले जाते.

भारतीय हवाई दल दिवसाचा थोडक्यात इतिहास: ''भारतीय वायु सेना'' म्हणूनही ओळखले जाणारे, भारतीय वायुसेनेची स्थापना दि.८ ऑक्टोबर १९३२ रोजी ब्रिटिश साम्राज्याने देशात केली. पहिले ऑपरेशनल स्क्वाड्रन एप्रिल १९३३ मध्ये अस्तित्वात आले. दुसऱ्या महायुद्धात भाग घेतल्यानंतरच भारतातील हवाई दल रॉयल इंडियन एअर फोर्स म्हणून ओळखले जाऊ लागले. भारतातील हवाई दल सन १९३२ मध्ये युनायटेड किंगडमच्या रॉयल एअर फोर्सचे सहाय्यक बल म्हणून अधिकृतपणे उंचावले गेले. तेव्हापासून हा दिवस दरवर्षी भारतीय हवाई दल दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय हवाई दल- भारतीय वायुसेना- आइएएफ भारतीय सशस्त्र दलांचे हवाई अंग आणि एक महत्त्वपूर्ण अंग आहे, जे देशाने लढलेल्या युद्धांमध्ये महत्वाची भूमिका बजावते. त्याचे प्राथमिक ध्येय भारतीय हवाई क्षेत्र सुरक्षित करणे आणि राष्ट्रांमध्ये सशस्त्र संघर्ष दरम्यान हवाई क्रियाकलाप आयोजित करणे आहे. भारतीय हवाई दलाने स्वातंत्र्यानंतर अनेक युद्धांमध्ये भाग घेतला आहे. भारतात हवाई दल दिवसाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यंदा ९४ वे वर्ष आहे. ३० पेक्षा जास्त चीनी लष्करी विमाने सलग दुसऱ्या दिवशी तैवानच्या दिशेने उड्डाण करतात. चीनने आपल्या राष्ट्रीय दिवशी तैवानच्या दिशेने ३८ लढाऊ विमाने पाठवली. जगातील सर्वात मोठ्या खादीच्या राष्ट्रध्वजाचे अनावरण गांधी जयंतीनिमित्त लेहमध्ये करण्यात आले. विशेष म्हणजे, भारतीय हवाई दल केवळ भारतीय प्रदेश आणि राष्ट्रीय हितसंबंधांचे सर्व धोक्यांपासून रक्षण करते असे नाही तर देशातील नैसर्गिक आपत्तींच्या वेळीही समर्थन पुरवते. म्हणूनच आपल्या जवानांच्या आणि संपूर्ण सैन्याच्या निस्वार्थ प्रयत्नांचा सन्मान आणि आ-ळख करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय हवाई दल (खत्र) बद्दल काही रोचक तथ्य- भारतीय वायुसेना (खत्र) जगातील चौथ्या क्रमांकाच्या ऑपरेशनल एअर फोर्समध्ये आहे. फक्त अमेरिका, चीन आणि रशिया भारताच्या पुढे आहेत. आज भारतीय हवाई दलाचा विस्तार ४५ पथके म्हणजेच सुमारे ५००-७०० विमान संख्या आहे, असे सांगण्यात येते. सध्या भारतात २-३ प्रकारच्या लढाऊ विमानांची निर्मिती सुरू झाली आहे. तौलनिक दृष्ट्या पाहावयाचे झाले तर, सन १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले, तेव्हा अमेरिकेकडे ८००, इंग्लंडकडे १९०० व जर्मनीकडे ४१०० लढाऊ विमाने होती. उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये स्थित हिंडन एअर फोर्स स्टेशन हे संपूर्ण आशियातील सर्वात मोठे एअरबेस आहे. तो ८ वा आहे, जगातील सर्वात मोठे आहे.

उत्तराखंडच्या महापुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करताना आयएएफने जागतिक विक्रम केला. या अभियानाला ''रहाट'' असे नाव देण्यात आले ज्या दरम्यान आइएएफने सुमारे २०,००० लोकांची सुटका केली. आयएएफ देखील ऑपरेशन पूमलई, ऑपरेशन विजय, ऑपरेशन मेघदूत आणि ऑपरेशन सिंदूर सारख्या विविध ऑपरेशनचा एक महत्त्वाचा भाग आहे. हे दल अगदी संयुक्त राष्ट्रांसोबत शांतता मिशनमध्ये काम करते. भारतीय हवाई दलाला आपली सेवा पुरवणाऱ्या महिला लढाऊ वैमानिक, महिला नेव्हिगेटर आणि महिला अधिकारी यांचा उल्लेखनीय समावेश सदर दलामध्ये आहे. आयएएफच्या राफेल ताफ्यातही एक महिला लढाऊ वैमानिक आहे. भारतीय हवाई दल - आइएएफ किंवा आइएसओ- भारतीय वायू सेना हे भारतीय सशस्त्र दलांचे हवाई अंग आहे. भारतीय हवाई क्षेत्र सुरक्षित करणे आणि सशस्त्र संघर्षांदरम्यान हवाई युद्ध करणे हे त्याचे प्राथमिक ध्येय आहे. दुसऱ्या महायुद्धादरम्यान भारताच्या हवाई सेवेचा सन्मान करण्यासाठी ब्रिटिश भारताचे सहायक हवाई दल म्हणून त्याची अधिकृतपणे दि. ८ ऑक्टोबर १९३२ रोजीच स्थापना झाली आहे, हे विशेष! विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !!

!!! भारतीय हवाई दल स्थापना दिनाच्या समस्त देशबांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी. दिनविशेषकार**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.**

## सांगोल्याचा राजकारणात नव्या समीकरणाची चाहूल; शहाजी बापूंच्या नेतृत्वाकडे युवकांचे लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : सांगोला तालुक्याचे राजकारणातील वर्तुळात सध्या नव्या समीकरणाची चर्चा रंगू लागली आहे पारंपारिक राजकीय गटाच्या पलीकडे. जाऊन युवक वर्गामध्ये माजी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या नेतृत्वाबाबत उत्सुकता वाढत असल्याची दिसून येत आहे.

शहरापासून ग्रामीण भागापर्यंत युवक कार्यकर्त्यांच्या वाढत्या संपर्कामुळे सांगोल्याच्या राजकारणात आगामी काळात काही बदल घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सोशल मीडिया लोक प्रियते पासून थेट जनसंपर्कापर्यंत साईबाबा पाटील यांच्या खास बोललेच्या शैलीने त्यांना राज्यभर वेगळी ओळख मिळवून दिली.

काय झाडी, काय डोंगर.... सर्व काही ओके, या त्यांच्या गाजलेल्या वक्तव्यामुळे ते महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर चर्चेचा विषय ठरले आहे. मात्र सांगोळे येथील त्यांच्या राजकीय वाटचालीकडे वाहताना केवळ सोशल मीडिया लोकप्रियतेपेक्षा स्थानिक पातळीवर जनसंपर्कला अधिक महत्त्व आहे.

जात असल्याची समर्थकांकडून सांगितली जात आहे तरुण वर्गाशी संपर्क साधून त्यांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न त्यांनी वारंवार केलेला आहे. त्यांच्या स्थानिक प्रश्नावर भूमिका घेणे त्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले युवकांच्या राजकीय सहभागाला वेग आजचा तरुण मतदार पारंपरिक राजकीय चौकटीपेक्षा विकास रोजगार शिक्षण क्रीडा आणि स्थानिक सामाजिक पातळीवर संधी यासारख्या मुद्द्याकडे अधिक गांभीर्याने पाहत आहेत

त्यामुळे युवकांना आपल्या सोबत जोडण्यासाठी प्रत्येक राजकीय नेतृत्वातून प्रयत्न सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर साईबाबा पाटील यांच्या संपर्कात येणाऱ्या युवकांची संख्या वाढत असल्याची चर्चा स्थानिक राजकीय वर्तुळात आहे. विविध भारतीय युवक कार्यकर्त्याकडून त्यांच्याशी संपर्क साधला जात आहे. काही जणांनी त्यांच्या नेतृत्वाला पाठिंबा देत व्यक्त केले जात आहे.



आजचा तरुण मतदार पारंपरिक राजकीय चौकटीपेक्षा विकास रोजगार शिक्षण क्रीडा आणि सामाजिक स्थानिक पातळीवरील संधी यासारख्या मुद्द्याकडे अधिक गांभीर्याने पाहत आहे.

त्यामुळे युवकांचा आपल्या सोबत जोडण्यासाठी प्रत्येक राजकीय नेतृत्वाकडून प्रयत्न सुरू आहे याच पाचवींवर शाही व उपडेंच्या संपर्कात असणारी युवकांची संख्या वाढत असल्याची चर्चा स्थानिक राजकीय वर्तुळात आहे विविध भागातील युवक कार्यकर्त्याकडून त्यांच्याशी संपर्क साधला जात असून काही जणांनी त्यांच्या नेतृत्वाला पाठिंबा व्यक्त करत केल्याची सांगितले जात आहे बदलत्या वातावरणात राजकीय परिणाम काय? सांगोला मतदारसंघातील राजकारणावर अनेक वर्षापासून ठराविक नेतृत्व आणि राजकीय गटांचा प्रभाव राहिला आहे. मात्र नव्या पिढीतील मतदार स्वतःची राजकीय भूमिका स्वतंत्रपणे ठरवू लागल्यास पारंपारिक समीकरणावर त्यांचा परिणाम होऊ शकतो युवकांचा वार्ता सहभाग हा कोणत्याही राजकीय पक्षासाठी किंवा नेतृत्वासाठी महत्त्वाचा घटक ठरू शकतो त्यामुळे साईबाबा वाटेल यांच्या भोवती युवकांची वाढणारी राजकीय सक्रियता आगामी काळात किती प्रभावी ठरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

आगामी राजकारणाची दिशा ठरवणार युवकाच्या भूमिकेने सांगोल्यात सध्या सुरू असलेल्या राजकीय हालचालीमुळे आगामी काळातील राजकीय चित्रा बाबत उत्सुकता वाढले आहे युवकाचे कल स्थानिक पातळी कार्यकर्त्याची भूमिका आणि बदलती राजकीय परिस्थिती याचा एकत्रित परिणाम आगामी निवडणुकीमध्ये समीकरणे होण्याची शक्यता आहे.

सांगोलातील राजकीय राजकीय हालचालींना आगामी काळात राजकीय चित्र बाबत चुकता लागली आहे. युवकांचा कल स्थान कार्यकर्त्याची भूमिका बदलत असली तरी राजकीय परिस्थितीचा एकत्र परिणाम आगामी निवडणुकीच्या समीकरणामुळे होण्याची शक्यता आहे. त्यामुळे साईबाबा पाटील यांच्या भोवती युवकांची वाढणारी राजकीय सकरीता आगामी काळात किती प्रभावी ठरते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे आगामी राजकारणाची दिशा ठरवणार युवकांच्या भूमिकेकडे? सांगोल्यात सध्या सुरू असलेल्या राजकीय हालचालीमुळे आगामी काळातील राजकीय चित्रासोबत उत्सुकता वाढले आहे युवकांचा कळस स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांची भूमिका आणि बदलती राजकीय परिस्थितींच्या एकरीत परिणाम आगामी निवडणुकीच्या समीकरणावर होण्याची शक्यता आहे.

सांगोल्यातील राजकीय वारे नेमके कोणत्या दिशेने वाहणारा आणि युवकाची ताकद कोणत्या पारड्यात जाणार याचे उत्तर आगामी काळातील राजकीय घडामोडी कडूनच स्पष्ट होणार आहे.

## सेवा, संकल्प आणि राष्ट्रहिताची ऊर्जा! सोलापूरकरांचा 'विकसित भारत' ध्येयाला उत्स्फूर्त प्रतिसाद!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/सोलापूर : देशाचे लाडके व यशस्वी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत सोलापूर शहर व जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित 'विकसित भारत संकल्प सभा व सेवा ज्योती यात्रा' अत्यंत उत्साहात पार पडली.

या अभियानांतर्गत आयोजित भव्य मोटारसायकल रॅली व पदयात्रेत मी स्वतः उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. छत्रपती संभाजी महाराज चौक (पुणे नाका) येथून रॅलीचा गौरवशाली प्रारंभ झाला, तर चार हुतात्मा पुतळा चौक येथे सांगता झाली.

'विकसित भारत-२०४७' हा केवळ संकल्प नसून प्रत्येक भारतीयाचे राष्ट्रीय ध्येय आहे. याच राष्ट्रहिताचा आणि निरंतर जनसेवेचा विचार घेऊन हजारो राष्ट्रप्रेमी नागरिक व कार्यकर्त्यांनी या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



याप्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. जयकुमार (भाऊ) गोरे, आमदार श्री. देवेंद्र कोठे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष श्री. शशिकांत नाना चव्हाण, जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. इंद्रजित भाऊ पवार , नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी, भाजपा यूवामोर्चा जिल्हाध्यक्ष श्री. महेश बिराजदार, मंडळ अध्यक्ष प्रदीप पाटील व अमोल हिप्परगी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी, सन्माननीय लोकप्रतिनिधी आणि निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादीच्या 'उद्योग मित्र' अभियानाला महाराष्ट्रातील उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, उद्योग व व्यापार विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त राबविण्यात आलेल्या 'उद्योग मित्र' विशेष अभियानाला महाराष्ट्रातील उद्योजक व व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष देशाचे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे साहेब, ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील साहेब, जितेंद्र आव्हाड साहेब आणि आमदार रोहितदादा पवार यांच्या मार्गदर्शनातून उद्योग व व्यापार क्षेत्रातील उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात आले होते.

विविध क्षेत्रांतील उद्योजकांच्या व्यवसायाची ओळख, त्यांचा संघर्ष, आणि यशस्वी वाटचाल समाजासमोर आणणे, हा 'उद्योग मित्र' अभियानाचा प्रमुख उद्देश होता. या अभियानातील प्रेरणादायी व्यावसायिक कहाण्यांमधून श्री.अश्विनकुमार खैरनार, श्री.सत्यवान भोसले, सौ.यमूना चव्हाण, सौ.स्पृहा वाडेकर, श्री.प्रवीण राऊत, श्री.मच्छिंद्र गोफणे, श्री.विजयकुमार मेलगे, श्री.नीरज कदम, सौ.प्राजक्ता मोटे, श्री.सचिन गायकवाड, श्री.शैलेश घोडके आणि श्री.वैजनाथ रणदिवे यांची विजेते म्हणून निवड करण्यात आली. उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष श्री.नागेश एकनाथ फाटे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. उद्योजकांच्या संघर्ष, मेहनत आणि जिद्दीच्या कहाण्या नव्या उद्योजकांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक उद्योजकांच्या कार्याला व्यापक व्यासपीठ मिळावे, त्यांच्या अनुभवातून नव्या उद्योजकांना प्रेरणा मिळावी आणि उद्योग-व्यापार क्षेत्रातील परस्पर संवाद व नेटवर्किंग अधिक मजबूत व्हावे या उद्देशाने 'उद्योग मित्र' अभियान राबविण्यात आले. अभियानाला प्रतिसाद देणाऱ्या सर्व उद्योजकांचे मनःपूर्वक आभार, असे नागेश फाटे यांनी नमूद केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निरोगी शरीर हीच खरी संपत्ती

## आमदार-किशोर दराडे; फ्रवशी टाऊन अकॅडमी नाशिक येथे फुट बॉल स्पर्धा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : फ्रवशी टाऊन अकॅडमी , नाशिक येथे दिनांक ५ व ६ ऑक्टोंबर रोजी संपन्न झालेल्या १४ ,१७ व १९ वर्षांखालील मुले-मुली रग्बी फ ुटबॉलच्या विभागीय सामन्यांचे उद्घाटन नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोरभाऊ दराडे यांचे शुभहस्ते करण्यात आले, प्रमुख अतिथी म्हणून रग्बी असोसिएशन चे अध्यक्ष संजय चव्हाण, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय होळकर, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुनंदा पाटील, क्रीडा अधिकारी आणि कबड्डीचा आंतरराष्ट्रीय खेळाडू सहाय्यक क्रीडा अधिकारी अक्षय शिंदे, माजी मुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी , डायरेक्टर ऑपरेशन प्रभाकर मुसळे यांच्यासह रग्बी संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

विभागीय स्पर्धा उद्घाटनाच्या प्रसंगी आमदार किशोर दराडे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास थोडा कमी झाला तरी चालेल पण फिटनेस वाढवा.. कारण आयुष्याम ध्ये निरोगी शरीर हीच खरी संपत्ती असून आरोग्याची गुरुकिल्ली म्हणजे शारीरिक साम र्थ्य आहे ते महत्वाचे असते असा मोलाचा सल्ला त्यांनी खेळाडूंना दिला.

विभागीय रग्बी स्पर्धेसाठी नाशिकसह धुळे ,जळगाव, नंदुरबार या जिल्ह्याचे मुला- मुलींचे संघ सहभागी झाले हो-ते. उद्घाटन प्रसंगी विशेष कामगिरीबद्दल आंतरराष्ट्रीय खेळाडू आकाश शिंदे , महाराष्ट्र व गोवा राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात कवितांचा समावेश झाल्याबद्दल कवी राजेंद्र सोमवंशी , विशेष सहकार्याबद्दल डायरेक्टर ऑपरेशन प्रभाकर मुसळे यांचेसह उपस्थित संघ व्यवस्थापक व पंच यांचा सन्मान आम दार किशोर भाऊ दराडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यावेळी क्रीडापिठावर शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर वाघ, सरचिटणीस विन-ोद हिरे, शहराध्यक्ष योगेश रोकडे,उपाध्यक्ष योगेश मोजाड , सरचिटणीस मनोज कनोजीया, कोषाध्यक्ष राम धोंगडे यांचेसह पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चे सदस्य अर्जुन टिळे , पोलिस उपनिरीक्षक सुनील कनोजीया, फ्रवशी टाउन चे डायरेक्टर ऑपरेशन प्रभाकर मुसळे यांच्या हस्ते करण्यात आला.

स्पर्धेचा अंतिम निकाल

**(१४ वर्षाआतील मुले)**

प्रथम -असिमा बाल शैक्षणिक केंद्र आवळखेड , नाशिक

द्वितीय- एस ए मिशन हायस्कूल व जुनिअर कॉलेज, नंदुरबार

तृतीय- हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज दोंडाईचा, (धुळे ग्रामीण )

**(१४ वर्षाआतील मुली)**

प्रथम- असिमा बाल शैक्षणिक केंद्र आवळखेड, नाशिक

द्वितीय- साधना एज्युकेशन इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, नाशिक रोड

तृतीय- श्रीमती .एच.जी. श्रॉफ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नंदुरबार

**(१७ वर्षाआतील मुले)**

प्रथम-नूतन विद्यामंदिर, देवळाली कॅम्प नाशिक ग्रामीण

द्वितीय-एस.ए.मिशन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय नंदुरबार

तृतीय -फ्रवशी टाऊन अकॅडमी, (नाशिक मनपा)

**(१७ वर्षाआतील मुली)**

प्रथम -नूतन विद्यामंदिर देवळाली कॅम्प (नाशिक ग्रामीण)

द्वितीय- रा.आ.महाजन माध्यमिक विद्यालय हिवरखेडे बु।। (जळगाव ग्रामीण)

तृतीय-श्रीमती .एच.जी. श्रॉफ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नंदुरबार

**(१९ वर्षाआतील मुले )**

प्रथम- नूतन विद्या मंदिर, देवळाली कॅम्प (नाशिक ग्रामीण)

द्वितीय - मिशन हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नंदुरबार

तृतीय -श्री स्वामी समर्थ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, धुळे

**(१९ वर्षा आतील मुली)**

प्रथम- नूतन विद्यामंदिर देवळाली कॅम्प (नाशिक ग्रामीण)

द्वितीय- हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज दोंडाईचा ,धुळे तृतीय- मिशन हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज , नंदुरबार असा निकाल लागला आहे

# युवा वारकरी लखन चव्हाण यांचे निधन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस. के.गायकवाड ): वागदरी ता.तुळजापूर येथील वारकरी सांप्रदायिक चळवळीतील युवा वारकरी मृदंगाचार्य व अभंग गायक रुपेश नागनाथ चव्हाण उर्फ लखन (बंटी) यांचे दि.६ आक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठिक ३.३० वा. दरम्यान सर्प दंशाने वया च्या २२ व्या वर्षी दुर्दैवी दुःखद निधन झाले आहे.त्यांचा दुःखद निधनाने वागदरी वर शोककळा पसरली असून अंत्यविधी प्रसंगी भक्ती सा-गराचे रुपांतर शोक सागरत झाल्यचे दिसून आले.

रुपेश चव्हाण यानी पदवी शिक्षण पूर्ण करून शेती व्यवसायात आपल्या वडीलाना मदत करत वारकरी सांप्रदायील चळवळीत चक्रिय झाले होते. एक उत्कृष्ठ युवा मृदंग वादक म्हणून त्यानी अल्पावधितच आ-पली ओळख निर्माण केली होती. दि.५ ऑक्टोबर २०२६ राजी रात्री अक्कलकोट तालूक्यातील मौजे किणी या गावी आयोजित भजन किर्तनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून आपली सेवा दिली होती.

**वागदरीवर शोककळा अंत विधी प्रसंगी वागदरीत भक्ती सागराचे रुपातर शोक सागरात**

दि.०६ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास वागदरी शिवारातील आपल्या शेतात झाडाखाली झोपले असता विषारी नाग सापाने त्याना चावा घेतला. उपचारासाठी सोल-ापूर येथील शाराकीय रुग्नालयात दाखल करण्यात आले होते.उपचारा दरम्यान त्यांची प्राण ज्योत मालवली. त्यांच्या निधनाने वारकरी सांप्रदाय चळवळीतील एक उमलता युवा वारकरी काळच्या पडद्याआड झाला आहे.मृत्यू समई त्यांचे वय अंदाजे २२ वर्षे होते.

त्यांच्या पश्चात आई वडिल आजी एक भाऊ, असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दि.७ ऑक्टोबर वार बुधवार रोजी सकाळी ठिक ९.०० वा. दरम्यान वागदरी येथे अंतिम संस्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांच्या दुःखद निधना बद्यल उपस्थित शोकग्रस्थ जनसमुदायानी त्याना भावपूर्ण श्रध्दांजली वाहीली या वेळी बाळूमामा पालखी महोत्सव किणी (भंगार ) ता. अक्कलकाट व किणी ग्रामस्थांच्या वतीने २१ हजार रुपये चव्हाण कुटुंबीयांना कृष्ण अर्पण केले.

# नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाचे मॉकड्रिल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : आगामी शारदीय नवरात्रौत्सव शांततेत व निर्विघ्नपणे पार पडावा तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी पंढरपूर शहर पोलीस दल पूर्णपणे सतर्क झाले असून, कोणत्याही आपत्कालीन किंवा अनुचित प्रसंगी पोलीस दल घटनास्थळी वेळेत आणि कसे पो-होचते याची चाचपणी करण्यासाठी आज बुधवारी (दि.७) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात मॉकड्रिल राबविण्यात आले. नवरात्रौत्सवात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर वेळीच



नियंत्रण कसे मिळवायचे याबाबत पंढरपूर शहर पो-लीस दलाकडून मॉकड्रिल करण्यात आले. यावेळी चित्त थरारक प्रात्यक्षिकांच्या माध्यम ातून रंगीत तालीम करण्यात आली. उत्सवाच्या काळात अनेकदा जमावाची परिस्थिती उद्भवते ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना कुठल्या परिस्थितीत कशा प्रकारची पावले उचलावयाची याबाबत शहर पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांच्या उपस्थितीत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर येथे मॉकड्रिल केली. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक सावजी, दत्तात्रय लेंडवे यांच्यासह १३ पोलीस ठाणे अंमलदार, शीघ्र कृती दलाचे १० जवान, दंगा काबु पथकाचे १६ जवान, बॉम्बशोधक व नाश पथकाचे १० जवान तर वाह-तूक शाखेचे ०६ पोलीस कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता.

**आपत्कालीन परिस्थितीत शीघ्रकृती दल तैनात ; उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सतर्क**

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये ‘नो प्रायव्हेट व्हेईकल डे’ उत्साहात







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या 'मेसा' तथा मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनच्या वतीने राष्ट्रपिता म हात्मा गांधी जयंती व भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वे-री कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने स्वेरीत ‘नो प्रायवेट व्हेईकल डे’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत म हाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्वतःची खासगी वाहने, विशेषतः दुचाकी व चारचाकी वाहने, महाविद्यालयात न आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याऐवजी महाविद्यालयीन बस, सार्वजनिक वाहतूक, सायकल अथवा पायी महाविद्यालयात येण्यास प्रोत्साहन देण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश इंधनाची बचत करणे, वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करणे, शाश्वत वाहतुकीला प्रोत्साहन देणे आणि पर्यावरणीय जबाबदारीबाबत जनजागृती करणे हा होता. ‘इंधन वाचवा, प्रदूषण कमी करा, शाश्वत गतिशीलतेला चालना द्या.’ शाश्वत सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन द्या, इंधन बचतीस प्रोत्स-ाहन द्या, वाहनांमुळे होणारे उत्सर्जन कमी करा या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यात आले. यामध्ये डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ व त्यांचे इतर प्राध्यापक वर्ग टांग्यातून व सायकलवरून, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार हे बसने तर डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. सतीश मांडवे टमटम ने कॉलेजला आले. स्वेरीचे काही स्टाफ हे एस.टी. ने कॉलेजला आले, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार ह्या ऑटो रिक्षाने म हाविद्यालयात पोहोचल्या. एकूणच स्वेरीचे प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारीसहित सर्व स्टाफ यांनी गांधी जयंतीच्या निमित्ताने स्वतः च्या वाहनाला सुट्टी दिली होती. यामुळे स्वेरी कॅम्पस मध्ये पार्किंगचे ठिकाण पूर्णतः रिकामे दिसत हो-ते. या उपक्रमाचे आयोजन ‘मेसा’ अध्यक्ष आदित्य डुबल, उपाध्यक्ष अश्विनी भोंग, सचिव रोहन नागरे यांच्या सहकार्याने करण्यात आले. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रम ुख डॉ. एस. एस. वांगीकर, मेसा समन्वयक प्रा. कुलदीप पुकाळे यांच्यासह महाविद्यालय प्रशासनाच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि शाश्वत वाहतुकीबाबत विद्यार्थ्यांमध्ये व महाविद्यालयीन समुदायामध्ये जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम ठरला. या उपक्रमाची चर्चा दिवसभर होत होती.

सध्या पुणे विभाग शिक्षक मतदान प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे स्वेरीचे सर्वेसर्वा डॉ.बी.पी. रोंगे सर हे संभाव्य उमेदवार असल्यामुळे पा-चही जिल्ह्यातील शिक्षकांच्या गाठी भेटी घेवून त्यांच्या समस्या जाणून घेण्यात व्यस्त आहेत तरीही स्वे-रीमध्ये दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या ‘नो प्रायव्हेट व्हेईकल डे’ उपक्रम ासाठी त्यांचे महत्वाचे मार्गदर्शन लाभले.

# पिंपळगाव बसवंत उंबरखेड शिव रस्ता सुमारे ५५ वर्षानंतर खुला




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

पिंपळगाव बसवंत उंबरखेड शिव रस्ता गेली ५५ वर्षापासून बंद होता हा रस्ता खुला करण्यासाठी तहसी-लदार विशाल नाईकवाडे यांचे आद-ेशानुसार पिंपळगाव बसवंत येथील मंडळ अधिकारी जयंत लिलके यांचे मार्गदर्शनाखाली पिंपळगाव बसवंत व उंबरखेड या दोन्ही गावातील शेतकरी यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत सर्व शेतकऱ्यांनी रस्ता खुला करणे कामी सहमती दर्शविल्यानंतर रस्त्याची मोजणी करून हद्दी व खुणा निश्चित करण्यात आले.व रस्त्यावरील अतिक्रमण दूर करून हा रस्ता वहिवाटीसाठी खुळा करण्यात आला तब्बल ५५ वर्षानंतर हा रस्ता वहिवाटीसाठी खुला झाल्याने शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले

यावेळी ग्राम महसूल अधिकारी गोरख गायकर, प्रसाद देशमुख, भूमी अभिलेखचे राजपूत, तसेच शेतकरी सुभाष निरगुडे, पुंडलिक निरगुडे ,बाळासाहेब खडके ,माणिक निरगुडे, राजेंद्र मोरे ,अरुण निरगुडे, संदीप म ोरे, रामराव निरगुडे, शरद मोरे ,निवृत्ती मोरे, नंदकुमार निरगुडे ,शिवाजी निर-गुडे, कमलाकर मोरे व शिवलगत सर्व शेतकरी गावकरी यांचे उपस्थितीत सदरची कामगिरी पार पडली

## पालखेड विद्यालयात सामाजिक वनीकरणाचा वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा

# विद्यार्थ्यांनी निसर्गसंपदेचे जतन करावे : वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील भिलावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी वन्यजीवांचे पर्यावरणातील महत्त्व, वन्यप्राण्यांचे संरक्षण,जंगलतोडीचे दुष्परिणाम तसेच मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहजीवन याबाबत काळजी घ्यावी.वन्यजीव वाचवा,निसर्ग वाचवा आणि भावी पिढीचे भविष्य सुरक्षित करा. असे सांगून विद्यार्थ्यांनी निसर्गसंपदेचे जतन करावे असे सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील भिलावे यांनी सांगितले.ते पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात वन्यजीव सप्ताह अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रम व बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक संजय दिघे,वनपरिमंडळ अधिकारी एन.एन.गांगोडे,वनसेवक के.डी. पाईकराव,अशोक शेळके,निलेश गवांदे,राहुल दवते, संदीप आहेर आदी होते.




यावेळी मुख्याध्यापक संजय दिघे यांनी वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करून वन्यजीवांचे पर्यावरणातील म हत्त्व,वन्यजीव व जैवविविधतेचे संवर्धन,जंगलतोड व मानवी हस्तक्षेपाचे दुष्परिणाम,वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्याची गरज,

वन्यजीवांबाबत विद्यार्थ्यांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती दिली.सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत वन्यजीव संवर्धनाचा संदेश देणारे घोषवाक्य, पोस्टर व विविध जनजागृतीपर उपक्रम सादर केले.तसेच यावेळी चित्रकला,वक्तृत्व,निबंध स्पर्धेतील विजेत्यांना प्रशस्तीपत्र व बक्षीसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप आहेर यांनी तर आभार अशोक शेळके यांनी मानले.

स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे

१) चित्रकला स्पर्धा

- लहान गट:(इ. ५ वी ते ७ वी)-

प्रथम- सानवी आहेर

द्वितीय-संयम आहेर

तृतीय-कावेरी थेटे

**--मोठा गट**

(इ. ८ वी ते १० वी)

प्रथम-आर्या जगताप,

द्वितीय-शिवम आहेर

तृतीय-अक्षदा खैरे

२) वक्तृत्व स्पर्धा -

**लहान गट**

प्रथम - स्वरा शिंदे,

द्वितीय -आर्या होलगडे,

तृतीय (विभागून) - गायत्री वाघ व धनश्री थेटे

**--मोठा गट**

प्रथम -प्राची पूरकर,

द्वितीय -मृण्मयी दिघे,

तृतीय -पूनम खैरे

३)निबंध लेखन स्पर्धा -

**--लहान गट**

प्रथम -सारथी जगताप,

द्वितीय -ईश्वरी जाधव,

तृतीय -स्नेहा जगताप

**--मोठा गट**

प्रथम -श्रुती शिंदे,

द्वितीय -श्रुती जगताप,

तृतीय -सृष्टी चौधरी

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# चंद्रभागा वाळवंट स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

## स्वच्छता अभियानातून १८ टन कचरा संकलित; अभियानात विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक संस्था व न.पा कर्मचाऱ्यांचा सहभाग







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ, सुंदर व निर्मळ ठेवण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर यांच्या पुढाकाराने आज चंद्रभागा वाळवंट परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानास विविध सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्थांनी उत्स्फूर्तपणे संख्येने सहभाग नोंदविला. या स्वच्छता अभियानातून तब्बल १८ टन कचरा संकलित करण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

सदर स्वच्छता अभियान पंढरपूर नगरपरिषद, जोगदंड महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री विठ्ठल गुरुकुल शिक्षण संस्था, पंढरपूर इस्कॉन तसेच विठ्ठल रुक्मिणी सुखाचे जीवन, रेंदाळ (ता. हातकणंगले) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.या अभियानात संबंधित संस्थांचे पदाधिकारी व स्वयंसेवक, पंढरपूर नगरपरिषदेचे विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच पदाधिकारी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

चंद्रभागा वाळवंट परिसरात राबविण्यात आलेल्या या विशेष स्वच्छता अभियानामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा संकलित करण्यात आला. अभियानादरम्यान १८ टन कचरा संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. स्वयंसेवक, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांनी श्रमदानातून परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला.यावेळी अभियानाच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

‘स्वच्छता हीच विठ्ठल सेवा’चा संदेश

पंढरपूर हे महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक पंढरपुरात येत असतात. चंद्रभागा नदी व वाळवंट परिसराला धार्मिक तसेच सांस्कृतिक महत्त्व असल्याने हा परिसर स्वच्छ व निर्मळ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची आणि भाविकांची सामूहिक जबाबदारी आहे.यावेळी स्वच्छता हीच विठ्ठल सेवा, श्रमदानातून भक्ती आणि सहभागातून स्वच्छता या संदेशांच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

दर बुधवारी श्रमदान अभियान

पंढरपूर शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ करण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषदेमार्फत दर बुधवारी सकाळी ७.३० वाजता स्वच्छता व श्रमदान अभियान आयोजित करण्यात येणार आहे.

या अभियानात शहरातील नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था , शैक्षणिक संस्था, विविध मंडळे आणि इतर इच्छुक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधून आपल्या संस्थेची नोंदणी करावी . नोंदणीसाठी उपमुख्याधिकारी रवींद्र सूर्यवंशी (भ्रमणध्वनी क्रमांक ८६६८८१४३६५)यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

पंढरपूर शहर स्वच्छ, सुंदर, निरोगी व निर्मळ ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून ‘स्वच्छ पंढरपूर - सुंदर पंढरपूर’ या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहनही यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले.

# खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयाचा ३६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयाचा ३६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सन १९९१ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेचा आजपर्यंतचा शैक्षणिक प्रवास अत्यंत गौरवास्पद राहिला आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी गावचे सुपुत्र, लोकनेते आदरणीय स्व. त्र्यंबकरावजी शेळके (दादा) यांनी पुढाकार घेऊन गावातील काही तरुण सहकाऱ्यांना सोबत घेऊन त्यांनी सन १९९० साली 'जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेची स्थापना केली. याच संस्थेच्या माध्यमातून २ ऑक्टोबर १९९१ रोजी 'जगदंबा कन्या प्रशाला' या नावाने शाळा सुरू करून मुलींसाठी स्वतंत्र शाळेची सोय त्यांनी उपलब्ध करून दिली.

सुरुवातीला छोट्या स्वरूपात सुरू झालेली ही शाळा आज गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र बनली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि समृद्ध संस्कार, हाच उज्ज्वल भविष्याचा भक्कम आधार हे ब्रीदवाक्य घेऊन शाळा कार्य करत आहे.

शिक्षण ही केवळ पुस्तकी विद्या नसून ती विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची वाटचाल आहे, या विचाराने शाळा विद्यार्थी घडवित आहे.

या वर्धापन दिन सोहळ्याचे अध्यक्षस्थान संस्थेचे ज्येष्ठ संचालक श्री. रामराजे (काका) शेळके हे होते,यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष श्री. अशोक (बापू) त्रिंबकराव शेळके, उपाध्यक्ष श्री. सुरेश (बापू) पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी संस्थेचे संचालक श्री. रामभाऊ अप्पाराव शेळके, श्री. सुनील जोशी, श्री. सुनील पाटील, श्री. शंकर कोष्टी, श्री. सुरेश यादव, श्री. शाम शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. तुकाराम गांधले, प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मंदाकिनी सावंत,सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उपअधीक्षक काशिनाथ भोईर यांचा प्रेरणादायी संवाद

# भरोसा येथील जिल्हा परिषद शाळेत ११५ विद्यार्थ्यांशी साधला मनमोकळा संवाद; मार्गदर्शनानंतर खाऊचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

शासकीय कर्तव्य बजावत असतानाच सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या भवितव्याला दिशा देण्याचा प्रयत्न भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक काशिनाथ भोईर यांनी केला. डखठ कार्यक्रमाच्या अनुषंगाने तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, भरोसा तसेच रामनगर केंद्र क्रमांक ४९ येथील शाळेला भेट देत त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भोईर यांनी शिक्षणाचे महत्त्व, जीवनात ध्येय निश्चित करून त्या दिशेने सातत्याने प्रयत्न करण्याची गरज तसेच आपल्या आवडी-क्षमता ओळखून भविष्यात योग्य क्षेत्राची निवड करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आजचे विद्यार्थी हीच उद्याची समाजाची ताकद आहे, या भावनेतून त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यास प्रोत्साहित केले.

भरोसा येथील शाळेत यावेळी एकूण ११५ विद्यार्थी उपस्थित होते. अधिकारी म्हणून असलेला औपचारिकपणा बाजूला ठेवत भोईर यांनी विद्यार्थ्यांशी अगदी खेळीमेळीच्या आणि आपुलकीच्या वातावरणात संवाद साधला. त्यामुळे विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

ग्रामस्थांकडून भोईर यांचा सत्कार

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक समाधान धोंडगे यांनी उपअधीक्षक काशिनाथ भोईर यांचा सत्कार केला. याप्रसंगी शिक्षक अनिल दुतोंडे सर, विलास जवंजाळकर सर तसेच डखठ टीमचे सहाय्यक संतोष क्षीरसागर, अनिकेत राठी, अश्विनी चौधरी आदी उपस्थित होते.

कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ठसा

डखठच्या कामकाजाच्या सुरुवातीपासूनच काशिनाथ भोईर यांनी सोपविण्यात आलेली जबाबदारी गांभीर्याने स्वीकारून आपल्या कामाला प्राधान्य दिले आहे. शासकीय कर्तव्य पार पाडताना केवळ कार्यालयीन जबाबदारीपुरते मर्यादित न राहता समाजातील विविध घटकांशी संवाद साधण्याची त्यांची कार्यपद्धती यावेळीही दिसून आली.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, त्यांच्या प्रश्नांना मिळालेली उत्तरे आणि भविष्यासाठी मिळालेले प्रोत्साहन, यामुळे भरोसा येथील शाळेतील हा संवाद विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

शासकीय अधिकारी आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला हा आपुलकीचा संवाद शिक्षण, संस्कार आणि भविष्यासाठी प्रेरणा देणारा ठरला, अशी भावना उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

## ‘माझे विद्यार्थी : सौंदर्य आणि समीक्षा’ या समीक्षाग्रंथाचे प्रकाशन

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात अभिजात मराठी भाषा सप्ताह उत्साहात

# पुस्तक वाचनातून मुक्त आणि निर्भय माणूस तयार होतो : ना. उदय सामंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुस्तक वाचनातून मुक्त, स्वतंत्र विचार करणारा आणि निर्भय माणूस तयार होतो. इंद्रधनुष्याचे विविध रंग शोधताना जो आनंद मिळतो, तसाच आनंद पुस्तकाची समीक्षा लिहिताना आणि वाचताना मिळतो. चांगले लेखन माणसाला अंतर्मुख करते, सुख-समाधान देते आणि मनात चांगल्या विचारांची पेरणी करते. पुस्तक हे केवळ ज्ञानाचे साधन नसून नवा माणूस आणि संस्कृती घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री ना. उदय सामंत यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. सुप्रसिद्ध साहित्यिक रघुराज मेटकरी यांच्या ‘माझे विद्यार्थी’ या व्यक्तिचित्रणसंग्रहावर आधारित ‘माझे विद्यार्थी : सौंदर्य आणि समीक्षा’ या समीक्षासंपादित ग्रंथाचा प्रकाशन सोहळा ना. उदय सामंत व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

या समीक्षाग्रंथाचे संपादन डॉ. वामन जाधव, डॉ. दत्तात्रय डांगे, डॉ. किसन माने आणि प्रा. मुकुंद वलेकर यांनी केले आहे. या संपादकांनी रघुराज मेटकरी यांच्या ‘माझे विद्यार्थी’ या ग्रंथाचा विविध अंगांनी चिकित्सक अभ्यास करून त्यातील साहित्यिक सौंदर्य, व्यक्तिचित्रणाची वैशिष्ट्ये, शिक्षक-विद्यार्थी संबंध आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव अधोरेखित केले आहे.

ना. उदय सामंत पुढे म्हणाले की, आजच्या काळात नव्या समीक्षाग्रंथांची मोठी गरज आहे. साहित्याचे वाचन आणि त्यावरील समीक्षा ही वाचकाला केवळ साहित्यकृती समजून घेण्यास मदत करत नाही, तर त्याला स्वतःकडे आणि समाजाकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची दृष्टी देते. चांगले साहित्य समाजाच्या मानसिक जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे अशा प्रकारचे समीक्षात्मक लेखन अधिक व्यापक प्रमाणात होणे आवश्यक आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ. प्रकाश महानवर यांनी ‘माझे विद्यार्थी’ या ग्रंथाचे आणि नव्या समीक्षाग्रंथाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, रघुराज मेटकरी लिखित ‘माझे विद्यार्थी’ हा ग्रंथ मुळातच सुंदर आहे आणि त्यावर आधारित ‘माझे विद्यार्थी : सौंदर्य आणि समीक्षा’ हा समीक्षाग्रंथ अतिशय सुंदर झाला आहे. ग्रामीण भागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारे आंतरिक, जिव्हाळ्याचे आणि भावनिक नाते या पुस्तकातून प्रभावीपणे वाचायला मिळते. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नात्याचे विविध पैलू या साहित्यकृतीतून उलगडले आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मानवविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. महेश खरात यांनी केले. त्यांनी समीक्षाग्रंथाच्या निर्मितीमागील भूमिका आणि ‘माझे विद्यार्थी’ या ग्रंथाचे साहित्यिक महत्त्व स्पष्ट केले. सूत्रसंचालन प्रा. कांबळे मॅडम यांनी केले, तर डॉ. दत्तात्रय डांगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या वेळी महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. श्यामकांत देवरे, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीकांत अंधारे, माजी मंत्री व विद्यमान आमदार सुभाषबापू देशमुख, खासदार डॉ. ज्योती वाघमारे, मानवविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. महेश खरात, समीक्षाग्रंथाचे संपादक डॉ. वामन जाधव, डॉ. दत्तात्रय डांगे, डॉ. किसन माने, प्रा. मुकुंद वलेकर, शास्त्र शाखेचे अधिष्ठाता डॉ. तिळवेकर, डॉ. दिवाकर कुलकर्णी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमास मराठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. सुवर्णा गुंड, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. केदारनाथ काळवणे, डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. उमराव मेटकरी, डॉ. ऋषिकेश मेटकरी, योगेश्वर मेटकरी यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे अधिकारी, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिजात मराठी भाषेच्या संवर्धनाबरोबरच मराठीतील दर्जेदार साहित्याचे वाचन, चिंतन आणि समीक्षा यांना चालना देणारा हा प्रकाशन सोहळा साहित्यप्रेमी आणि विद्यापीठातील उपस्थितांसाठी विशेष ठरला.